‘यदा सर्वे प्रमुच्यन्ते’ हें श्रुतिवाक्य येथें प्रमाण आहे. अर्थात् वासनांच्या अस्तित्वानें तदनुसारें अभीष्टलोकप्राप्ति होते आणि वासनांच्या अभावींच ब्रह्मप्राप्ति होते हें सिद्ध जाणावें.

वेदांतील मुण्डकोपनिषदांतील ‘कामान्यः कामयते’ या वाक्यांत हेंच सांगितलें आहे.

भगवच्चरणोदयाचें वर्णन करितात - तो, मध्यमाधिकारी भक्तांचें अविद्यादिकांपासून रक्षण करितो. ‘तेषामेवानुकम्पार्थें’ या गीतावचनांत हेंच दर्शविलें आहे. ।। २।।

वासनांवर जय मिळविण्यासाठीं देवा तुमच्या भक्तीचीच आवश्यकता आहे असें सांगतात. -

भवति भावभवोऽवभवो यदा भवति कामनिकामहतिस्तदा।।
भवति मानवमानवदुत्तमे भवतिरोधिरतो विरतोत्तमे।।३।।

अन्वयः - यदा भवति अवभवः भावभवः भवति तदा कामनिकामहतिः भवति। अतः (ऊर्ध्वं) विरतोत्तमे मानवमानवदुत्तमे भवतिरोधिः भवति।।३।।

अर्थ :- जेव्हां भवपीडेला तुच्छ समजणा-या तुमच्या भक्तीचा उदय होतो तेव्हांच वासनांचा समूळ नाश होत असतो । आणि मानवांमध्यें मान्यतम अशा उत्तम सौख्याविषयींही विरक्त असलेल्या त्या थोर पुरुषाचा संसारही लय पावतो।।

सारांश :- भगवद्भक्तीच्या योगानेंच वासनाक्षय होतो आणि वैराग्य होऊन कृतकृत्यता प्राप्त होते ।। ३।।

टीकार्थ :- श्रीगुरुमहाराज ! ज्या वेळेस, ज्याच्या योगें जन्ममरण परंपरारूप संसारच नाश पावतो, अशा तुमच्या विषयीं अष्ट सात्विकभावल्लक्षण दृढ भक्तीचा उदय होतो. त्या वेळेस मानवांत श्रेष्ठ अशा ब्राह्मणांतही गरुड पुराणंतील (मनु.). भूतानां प्राणिनः श्रेष्ठा... कर्तृषु ब्रह्मवादिनः’ या वाक्यांप्रमाणें सर्वश्रेष्ठ असलेल्या ब्रह्मनिष्ठ भवद्भक्त महापुरुषाच्या

अन्तःकरणंतील वासनांचा आत्यंतिक विनाश होतो. याप्रमाणें वासनानाश होऊन ब्रह्मलोकांत उत्तम सुखांविषयींही विरक्त असलेल्या आल्या भक्ताच्या अन्तःकरणंत शुद्ध ज्ञानोत्तर चतुर्थ भक्तीचा उदय होतो आणि त्यानंतरच जन्ममरणरूप संसार निवृत्त होतो. अर्थात् मिथ्या अशा अहंममताभिमानापासून प्रादुर्भूत होणा-यास संसारच उरत नाहीं. याप्रमाणें परंपरेनें आपल्या भक्तीनेंच परमपदप्राप्ति होते. हेंच 'नायमात्मा' या कठोपनिषदांतील वचनांत सांगितलें आहे. 'पुरुषः स परः पार्थ' या गीतावचनांतही हेंच वर्णिलें आहे. अर्थात् ज्ञानोत्तर होणारी हेतुरहित निस्सीम प्रेमस्वरूप भक्तीच येथें चातुर्थिकी भक्ति जाणवी असें 'विमुच्य निर्ममः शान्तो' इथपासून 'मद्भक्तिं लभते पराम्' इथपर्यंत गीतेच्या भाष्यांत भाष्यकारांनीं स्पष्ट दाखविले आहे.।। ३।।

अशा शुद्ध भक्तीचा उदय होण्यासाठीं सत्संगाची आवश्यकता आहे हें पुढील पद्यांत सांगतातः-

तव सतां वसतां मनसाऽनसा प्रपदयोः पदयोरजसांजसा।।
सुसहितस्तव स हितस्तव तावता यदवतारवता जनताविता।।४।।

अन्वयः- अनसा मनसा तव प्रपदयोः वसतां सतां पदयोः रजसा सुसहितः अञ्जसा स तव हितः। यद् अवतारवता (भवता) जनता अविता(अस्ति)।।४।।

अर्थ :- रथाप्रमाणें वेगशाली अशा मनानें तुझ्या चरणीं लीन असणा-या संतांच्या पादरजाचा आश्रय करणारा तो भक्त शीघ्रच तुम्हाला प्रिय होतो; कारण, अनेक अवतार घेऊन तुम्हीं भक्तजनांचें रक्षण केलें आहे।।

सारांशः- भगवद्भक्त अशा सन्तांच्या कृपेनेंच भगवद्भक्तीचा लाभ होऊन भगवत्प्रीति सम्पादन करितां येते ।। ४।।

टीकार्थ :- श्रीसद्गुरुमहाराज ! वेगशाली शकटाप्रमाणें चंचल अशा मनानेंही तुमच्या चरणाग्राच्या ठिकाणीं निरंतर वास करणा-या संतांच्या चरणरजानें युक्त असलेला कुणीही भाग्यशाली मानव तुम्हाला अत्यंत प्रिय असतो. असें भागवतांतील 'सत्संगलब्धया भक्त्या' या आणि 'न तथा मे प्रियतम' या श्लोकांत सांगितलें आहे. या भगवत्प्रियत्वाची उपपत्ती दर्शवितात - 'ज्या कारणास्त मत्स्यादि अवतार धारण करून आपण सज्जनांचें रक्षण केलें आहे' - अर्थात् सज्जनांचें रक्षण हें भगवदवताराचें प्रयोजन सुचविलें आहे. सत्पुरुषांच्या चरणरजोलाभानेंच भक्तीचा लाभ होतो व परंपरेनें मुक्ति प्राप्त होते. त्यावरून केवळ आपल्या बुद्धीच्या जोरावर केलेला ब्रह्मविचार फळत नाहीं हें दर्शविलें आहे.

'आचार्यवान्' 'तद्विज्ञानार्थं' 'यस्य देवे' 'नैषा मतिः' या शेंकडो श्रुतिवचनांवरून हें सिद्ध आहे. 'तद्विद्धि प्रणिपातेन' गुरुं विना न श्रवणं' 'रहूगणैतत्ततसा' इत्यादि स्मृतिपुराणवचनांवरूनही हेंच सिद्ध होतें ।। ४।।

'असंगो ह्ययं पुरुषः' इत्योदि वचनांनीं विकारातीत अद्वितीय आणि सद्रूप आत्म्याचें असंगत्व सांगितलेलें असलें तरी पुढील प्रमाणें त्यालाही सम्बन्धित्व येतें. कारण समवाय, संयोग आणि तिसरा अध्यासमूलक असे तीन प्रकारचे संबंध असतात. त्यांपैकी अवयव

आणि अवयवी, गुणगुणी, क्रियाक्रियावान्, जातिव्यक्ति आणि नित्यद्रव्यविशेष यांचा संबंध समवाय असतो. अर्थात् आत्म्याचा शरीरादिकांशीं अवयवावयविभावादिमूलक समवाय संबंध होऊं शकत नाहीं. परस्परांहून भिन्न असलेल्या दोन द्रव्यांचा परस्परांशीं संयोग-संबंध होतो. जसें नगारा आणि दण्डाचा संयोग. पण सिद्धांतांत आत्म्याचें द्रव्यत्व मानिलें नसल्यामुळें त्याच्या ठिकाणीं संयोगसंबंधही संभवत नाहीं. जरी कांहीं नैयायिक आदींनीं 'आत्मा हा आकाशाप्रमाणें रूपरहित द्रव्य असून त्यावरील शब्दाप्रमाणें आत्म्याच्या ठिकाणीं चैतन्य हा गुण' असें मानिलें असलें तरी तें योग्य नाहीं, कारण आत्मा हा नित्य, विभु आणि विकारातीत आहे. (आकाश हे सुद्धा सिद्धान्तिमतांत अनित्य आहे.) आतां रज्जुसर्प, शुक्तिरजत, स्थाणुपुरुष अथवा आकाश आणि नीलवर्ण यांचा जसा काल्पनिक संबंध असतो तसा आत्म्याचा आणि देहेन्द्रियांचा अध्यासमूलक संबंध मात्र संभवतो. अध्यास म्हणजे 'एका वस्तूचा अन्य वस्तूवर भ्रमानें होणारा आभास.'

जड अहंकार आणि चेतन आत्मा यांना संमिलित अशा एका 'मी' इत्याकारक प्रत्ययांत विषयत्व दिसतें, त्या अर्थी आत्मा आणि देहेन्द्रियादिकांचा अन्यान्याध्यासमूलक सम्बन्ध होय. आणि या अध्यासाचा निरास वर्णाश्रमविहित नित्यनैमित्तिककर्मांच्या निष्काम अनुष्ठानानें चित्तशुद्धिपूर्वक साधनचतुष्टय प्राप्त होऊन महावाक्यांच्या विचारापासून झालेल्या तत्त्वज्ञानानेंच होतो असा सिद्धान्त आहे. 'शमाद्युपेतः स्यात्' आणि 'अग्निहोत्रादि' या सूत्रांत हाच सिद्धान्त स्पष्ट केला आहे.

'मंत्रेषु कर्माणि' आणि 'यस्याग्निहोत्रं' या मंडुकश्रुतीवरूनही निष्काम कर्माची चित्तशुद्धीसाठीं आवश्यकता स्पष्ट दिसून येते. अभियुक्त आचार्यांनींही ''जोपर्यंत 'अहं ब्रह्म' हे वाक्यार्थज्ञान दृढ होत नाहीं तों पर्यंत साधनचतुष्टयसंपन्न होऊन साधकानें श्रवणादिकांचा अभ्यास केला पाहिजे'' असें म्हटलें आहे.

आतां साधनचतुष्टयाचें निरूपण करूं :- नित्य आणि अनित्य वस्तूंचा विवेक, ऐहिक आणि पारलौकिक फलभोगाविषयीं वैराग्य, शमादि सहा साधनें आणि मोक्षाची तीव्र तळमळ हीं तीं चार साधनें होत. अर्थात - श्रुतिस्म्रतिपुराणादिकांवरून ब्रह्म हेंच खरें असून जगत् असत्य आहे असें निरपेक्ष ज्ञान म्हणजे नित्यानित्यवस्तुविवेक. इहलोकांतील स्रक्चंदनादिविषयभोग आणि स्वर्गांतील अप्सरांसह दिव्य सुखांचा उपभोग या दोहोंविषयीं अत्यन्त घृणा म्हणजेच इहामुत्रार्थफलभोगविराग होय. शम दम तितिक्षा श्रद्धा आणि समाधान ही शमादि षट्क सम्पत्ति होय. शम म्हणजे श्रवणादिकाव्यतिरिक्त इतर क्रियापासून मनाला निवृत्त करून आत्मविषयक श्रवणादिकांमध्येंच लावणें. ज्ञानेन्द्रियें आणि कर्मेन्द्रियें यांचा निग्रह म्हणजे दम. प्रथम निष्कामकर्माचरण करून सा-या व्यवहाराचा लोप झाल्यावर विधिपूर्वक संन्यास करणें म्हणजेच उपरति.

प्रारब्धानें प्राप्त होणा-या सुखदुःखांचे आघात सहन करणें हीच तितिक्षा. आचार्य आणि वेदान्तवाक्याच्या ठिकाणीं विश्र्वास म्हणजे श्रद्धा अनुकूल विषयांच्या ठिकाणीं चित्ताची एकाग्रता म्हणजेच समाधान.

घराला आग लागून स्वतःवर जळण्याची पाळी आली असतां स्त्रीपुत्रादिकांचा विचारही मनांत न आणतां ज्याप्रमाणें तेथून निसटण्याच्या विषयांत तळमळ लागते तशी संसारिक ताप मिटविण्याकरितां सर्व एषणांचा त्याग करणाराला जी मोक्षाविषयीं तीव्र इच्छा तीच मुमुक्षा होय.

जगांत असें दिसतें कीं, विवेक असून सुद्धां वैराग्य पूर्ण झालें नसतें. कुठें कुठेंतर हीं दोन्हीं असूनही मोक्षाच्या आड येणा-या क्रोधादिकांचे वास्तव्य असतें, यासाठीं शमादि हे आवश्यक आहेत. कुठेंकुठें तर ही तिन्ही साधनें असूनसुद्धां भेदभावनेनें उपासना करणारांना ज्ञानाधिकार दिसत नाहीं त्याअर्थी मुमुक्षेचीही अत्यन्त आवश्यकता आहे. याप्रमाणें साधनचतुष्ट्यानें संपन्न असलेल्या जीवालाच तत्त्वज्ञानांत अधिकार प्राप्त होतो.

या साधनांची प्राप्ती होणें हें सर्वथा निष्काम कर्माचरणानें प्राप्त होणा-या सत्संतीवर अवलंबून आहे, हें पुढील श्लोकांत दर्शवितातः-

कृतफलं तु विहाय विहायसा सममजं भजतामज तामसात्।।
मिलति तारकमत्र कमत्रसत्पदरजो भ्रमहारि महारि सत्।।५।।

अन्वयः- हे अज कृतफलं विहाय विहायसा समम् अजं (त्वां) भजतां तामसात् तारकं भ्रमहारि महारि सत् कम् अत्रसत्पदरजः अत्र मिलति।।५।।

अर्थ :- हे अजा, कर्मफलांचा त्याग करून आकाशाप्रमाणें सर्व व्यापक आणि विकारातीत अशा तुम्हाला अशा तुम्हाला भजणारांचा तमोमय संसारांतून उद्धार करणारें, भ्रमनिरास करून अविद्यादिकांचा नाश करणारें, मङ्गलदायक आणि म्हणूनच प्रशंसनीय असें क्लेशरहित अशा संतांचें चरणरज प्राप्त होतें।।

सारांश :- निष्काम कर्माचरणानें चित्तशुद्धि होऊन सन्तकृपा प्राप्त होते व साधनचतुष्ट्यसम्पत्तीचा लाभ होतो ।। ५।।

टीकार्थ :- फलाभिलाषारहित होऊन नित्य आणि नैमित्तिक कर्मांचे, साधनसंपत्ती प्राप्त होऊन चित्तशुद्धिपर्यंत अनुष्ठान केलें पाहिजे. त्यानंतर 'ते ह स्म पुत्रै-' या श्रुतीवरून आणि 'नैष्कर्म्यसिद्धिं' या स्मृतीवरून संन्यास करावा. कारण संचित पातकांच्या नाशासाठीं नित्य नैमित्तिक कर्मांचें अनुष्ठान केलेंच पाहिजे. 'वीरहा वा' या श्रुतीवरून कर्मे न केल्यास प्रत्यवायही सांगितला आहे. श्लोकांतील 'कृतफलं विहाय' याचा हा अर्थ आहे. तेथील 'तु' शब्दानें निषिद्ध आणि काम्य कर्माची व्यावृत्ति सुचविली आहे. कारण मुंडकोपनिषदांत या कर्माची निंदा केली आहे. अर्थात् मुमुक्षूनें नित्यनैमित्तिक कर्मांचें केवळ ईश्वरार्पण बुद्धीनेंच अनुष्ठान करावें, त्यायोगें बन्ध न होतां चित्तशुद्धी होईल. 'कुर्वन्नेवेह' इत्यादि शेकडों श्रुति स्मृतिवचनांवरून हें सिद्ध होतें.

अजा ! श्रीसद्गुरुमहाराज ! आकाशाप्रमाणें व्यापक अशा आपली निष्कामकर्माचरणरूप स्वधर्मानुष्ठानानें सेवा करणा-या भक्तांना तमोरूप संसारापासून तारणारें सुखमय असें संतांचें रज प्राप्त होतें, ते सत्पुरुष अविद्यादिक्लेशापासून त्रास पावत नाहींत आणि 'दुःखेष्वनुद्विग्नमनाः' या गीतोक्तीप्रमाणें ते स्थितप्रज्ञ जीवन्मुक्तच असतात.

संतांचें पदरजही विवर्त भ्रमाचें हरण करणारें असून अविद्यादि मोठमोठ्यांचें नाशकारक असतें, (विवर्त म्हणजे अधिष्ठानानें संतसमागम होऊन साधनचतुष्टयप्राप्ति होते आणि पूर्वोक्त क्रमानुसारें मोक्षलाभ होतो. ।। ५।।

याप्रमाणें पांचव्या श्लोकांत निष्कामकर्माच्यायोगें संतसमागमाचा लाभ सांगितला. चौथ्या आणि तिस-या श्लोकांत सत्संगानें भक्तीचा लाभ होऊन वासनानाश होतो हें दाखविलें, दुस-या श्लोकांत तटस्थलक्षणानें लक्षित अशा ब्रह्माची तटस्थ आणि स्वरूप लक्षणें दाखवून स्तुति करण्यांत येत आहेः-

तदजरामर कोशविलक्षणं सदज धीगुणवेत्तृ कलक्षणम्।।
भुवनहेत्वघहृत्त्रिपुरादिकं तव न जातु पदं कुपुराधिकम्।।६।।

अन्वय :- हे अजरामर अज, कोशविलक्षणं सत् धीगुणवेतृ कलक्षणं भुवनहेतु अघहृत् त्रिपुराधिकं तव तत् पदं जातु कुपुराऽऽधिकं न।।६।।

अर्थ :- हे अजरामर परमेशा ! अन्नमयादि पंच कोशांहून विलक्षण सत्य, बुद्धिवृत्तीचें साक्षिस्वरूप, आनन्दमय, जगत्कारण, भक्तांच्या पातकांचा नाश करणारें, तिन्ही देहांहून निराळें असें तें तुमचें पद, असत्, जड आणि दुःखरूप अशा देहत्रयांच्या उपाधीनें लिप्त नाहीं।।

सारांश :- परमेश्र्वराचें स्वरूप सर्वसाक्षी, द्वैतभ्रमाचें अधिष्ठान, सच्चिदानन्दमय, अर्वानर्थनिवारक आणि स्वप्रकाश आहे असें तटस्थ लक्षण येथें सांगण्यांत आलें आहे।। ६।।

(या श्लोकांतील पदांनीं गायत्रीमन्त्रार्थ सूचित केला आहे, तो श्री.महाराजांच्या व्याख्येमध्यें पहावा।)

टीकार्थ :- अजरामर या सम्बोधनानें निर्विकारत्व दर्शविलें हेंच तटस्थ लक्षण होय. अन्नमयादि पांच कोशांहून निराळें, नित्यनिरंतर एकरूप, जाग्रत्स्वप्न आणि सुषुप्तिरूप बुद्ध्यवस्थांचेठायीं, असें ब्रह्म आहे. हेंच साक्षित्व 'त्रिषु धामसु' या श्लोकांत सांगितलें आहे. तेथें 'जो मी स्वप्नद्रष्टा होतों व मला कांहीं समजलें नाहीं आतां तोच मी जागा झालों आहें' असा सर्वांचा अनुभव असल्यामुळें अन्वय अनुमानानेंच साक्षीचं एकत्व सिद्ध होतें. साक्षीचा कोठेंही अभाव नसल्यानें व्यतिरेकी अनुमान येथें लागू होत नाहीं.

पुनः तें ब्रह्म सुखस्वरूप आणि सर्व भुवनांचें कारण असून भक्तपापहारक आहे. धातूंनीं पूरित होणा-या देहरूपी पुरापेक्षां विलक्षण असें तुमचें स्वरूप अत्यंत शुद्ध असल्यानें केव्हांही कुत्सित अशा शरीरपुरींत असणा-या कामक्रोधादि आधीनें युक्त नसतें.

(शरीरस्थ धातूंच्या वैषम्यानें स्थूल देहास ज्वर येतो तर सूक्ष्म देहांत कामक्रोध प्रादुर्भूत होतात आणि यांचें कारण बीजभूत अज्ञान कारण देहांत असतें.)

याप्रमाणें तटस्थलक्षणानें युक्त असें ब्रह्मस्वरूप वर्णन केलें.

या श्लोकांतील पदांनीं गायत्री मंत्रार्थही सुचविला आहे. कोशविलक्षण असें उपधिरहित ब्रह्म हाच तत् पदाचा अर्थ. भुवनहेतु येथें सर्गस्थितींचें ही उपलक्षण असल्याकारणानें सर्व

प्रपंचभ्रमाच्या उत्पत्तीचें अधिष्ठान असा सवित्रपदार्थ झाला. कलक्षणम् यानें अविद्यादि दोषांचें भर्जन करणारा भर्गपदार्थ सुचविला. 'त्रिपुराधिकम्' या व्यापक उक्तीनें अखण्ड चैतन्यरूप देवपदार्थ दर्शविला. 'कुपुराधिकं जातु न' यायोगें तिन्ही देहांतील ज्वरांचा स्पर्शही नसल्यानें निर्गुण व निर्विकार स्वरूपचिंतनात्मक ध्यानपदार्थ वर्णिला. पदशब्दानें यत्पदाचा अर्थ सुचविला. अ म्हणजे विष्णु, त्यापासून झालेले जीव म्हणजे अज, त्यांच्या धीगुणच्या उल्लेखानें 'धी' पदार्थ सुचविला तर त्यांचें साक्षिभूत असा अर्थ असलेलं 'तद्वेत्तृ' हें पद चोदना दर्शवितें. अशा प्रकारें सर्व विश्वाला साक्षीस्वरूप, एकंदर द्वैतात्मकप्रपंचभ्रमाचें अधिष्ठान, आनंदस्वरूप असून समर्थ, अनर्थांचा निरास करणारें, सर्व विश्वाला प्रकाशित करून प्रेरणा देणारें, स्वयंप्रकाश चैतन्यमात्र असें परब्रह्मच ध्येय आहे असा एकंदरींत अर्थ जाणावा.

एकंदरींत ब्रह्माचें स्वतःच्या विवर्तरूप जगाशीं रज्जुसर्पन्यायानें अध्यारोप आणि अपवादाच्या साह्यानें होणारे सामानाधिकरण्यरूप ऐक्य दर्शविलें आहे.।। ६।।

आतां स्वरूपलक्षण सांगतात :-

विविधभेदपरं सम दृश्यते त्रिविधवेदपरं कमदृश्य ते।।
पदमिदं सदु चिद्‌घनमुद्धियासदनिदं प्रजहात्यघनुद्धिया।।७।।

अन्वय :- ह् सम अदृश्य ! विविधभेदपरं त्रिविधवेदपरं सत् उ चिद्‌घनं कं इदं ते पदं उद्धिया दृश्यते। या हि अघनुत् (धीः) अनिदम् असत् प्रजहाति।।७।।

अर्थ :- शत्रु मित्र आणि उदासीन भावातीत, प्रत्यक्ष प्रमाणांचा जेथें प्रवेश नाहीं अशा सद्‌गुरु देवा ! त्रिविधभेदातीत आधि ज्ञान कर्म व उपासनाप्रतिपादक अशा तिन्हीं वेदांचें सारभूत, सच्चिदानन्द आणि नित्य अपरोक्ष अशा तुमच्या पदाला पापनाशक अशी तीच सूक्ष्म बुद्धी जाणूं शकतें; जी असत्य आणि अनात्मस्वरूप अशा प्रपञ्चाला मिथ्या समजून त्याग करिते।।

सारांश :- या पद्यांत भगवन्ताचें स्वरूपलक्षण सांगितलें आहे व तें प्रत्यक्षादिप्रमाणगोचर असलें तरी शास्त्रार्थोपदेशानें सुसंस्कृत अशा विवेकयुक्त सूक्ष्म बुद्धीला ग्रहण करितां येतें असें वर्णन केलें आहे.।। ७।।

टीकार्थ :- शत्रु मित्र आणि उदासीन भावांनीं रहित अशा समस्वरूपा सद्‌गुरो ! ब्रह्म हें दोषरहित असून सम आहे असें गीतेंत म्हटलें आहे. आपण प्रमाणातीत मानिल्यास 'आत्मा द्रष्टव्यः' या श्रुतीची वाट काय अशी शंका येणें स्वाभाविक आहे (त्या प्रसंगानें प्रमाणविचार करितात.) प्रत्यक्षादि चार प्रमाणें लोकांत प्रसिद्ध आहेत. इन्द्रियांपासून होणरे प्रत्यक्ष आत्मा हा इन्द्रियगोचर नसल्यामुळें प्रत्यक्षविषय होत नाही. कारण 'न तत्र चक्षु' इत्यादि रूपानें हें पर्वतावरील धूमावरून होणारे अग्नीचें ज्ञान, तेंही आत्म्याच्याविषयीं संभवत नाहीं. कारण आत्मा 'आकाशवत्' या वचनावरून निरवयव असल्यामुळें त्याचें एकदेशदर्शन होणें शक्य नाहीं. सादृश्यांवरून होणा-या ज्ञानास उपमान म्हणतात. आत्मा हा अद्वितीय असल्यामुळें

तेंही संभवत नाही. अर्थात् उरलेले जें 'तत्त्वमस्या'दि महावाक्यरूपी शब्दांनीं मात्र आत्म्याचें ज्ञान होऊं शकतें. त्यामुळं आत्मा शब्दप्रमाणाला विषय होतो.

आप्तवाक्यालाच शब्दप्रमाण म्हणतात आणि भ्रमप्रमादादिकांनी रहित असलेल्या सत्यवक्त्या पुरुषला आप्त असें म्हणतात. असा एक ईश्वरच आहे. कारण पतंजलीच्या योगसूत्रांत वर्णिल्याप्रमाणें तो क्लेश, कर्म, विपाक आणि आशय यांनीं अस्पृष्ट असा श्रेष्ठतम पुरुष आहे. येथें अविद्या, अस्मिता, राग, द्वेष आणि अभिनिवेश हे पांच क्लेश होत. अनिष्ट इष्ट आणि मिश्र हीं तीन प्रकारचीं कायिक, वाचिक आणि मानस कर्मे होत. कर्मांचे जन्म, आयु आणि भोग हे तीन परिणाम म्हणजेच विपाक, त्यांनीं युक्त असलेले म्हणजेच आशय, यांनीं अस्पृष्ट अशाईश्वराचें वाक्य म्हणजेच वेद. श्रुतीनें ही तसें सांगितलें आहे. या रीतीनें आत्मा हा शब्दप्रमाणालाच गोचर होतो हें सिद्ध होतें.

श्रवण केल्यानंतर, प्रथमतः शब्दापासून संदेहरहित पण परोक्ष ज्ञान होतें. कारण परोक्ष ज्ञान उत्पन्न करून देणें हा शब्दाचा धर्मच आहे; आणि अन्वयव्यतिरेकांवरून उभारलेल्या या धर्माचें उल्लंघन करण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं. त्यानंतर मनन व निदिध्यासन या सहकारि कारणांच्या योगें त्याच शब्दांपासून होणरें ज्ञान अपरोक्ष होतें. श्री भारतीतीर्थांनीं म्हटलेंच आहे - विचारापासून परोक्ष आणि अपरोक्ष असें दोन प्रकारचें ज्ञान होतें आणि अपरोक्ष साक्षात्कारांतच शब्दजन्य ज्ञानाचे पर्यवसान होतें. याच अभिप्रायानें म्हणतात - 'हे अदृश्या, शब्दावांचून अन्य प्रमाणाला विषय न होणा-या सद्‌गुरो आपलें पद; पत्र-पुष्प-फलाप्रमाणें कारण वृक्षाचीं पानें, फळें, पुष्पें इत्यादि हे स्वगत भेद होत. आपण निरवयव असल्यामुळें तो भेद आपणांवर नाहीं. ज्याप्रमाणें अन्य वृक्षापासून असणारा भेद हा सजातीय भेद असतो, आपण आनन्दैकरस आहांत, कोणत्याही प्रकारचें वैलक्षण्य आपल्या ठिकाणीं नाहीं. त्याअर्थी तोही भेद संभवत नाहीं. कारण आपणापेक्षां अन्य सर्व असत् असल्यानें - मिथ्याच असल्यानें आपण अद्वितीय आहांत. तसेंच ज्ञान, उपासना आणि कर्मप्रतिपादक काण्डत्रयरूप जे वेद त्यांचें प्रतिपाद्य आपलें पद आहे, कारण सर्व वेदांचें तात्पर्य परब्रह्माच्याच ठिकाणीं आहे. आपलें पद इदंप्रतीतीला विषय अर्थात् स्वयंप्रकाश आणि अपरोक्ष आहे. कारण, इदं शब्दाचा अपरोक्ष आणि तत् शब्दाचा परोक्ष या अर्थी उपयोग करितात. विद्यारण्यस्वामींनीही 'अयम्' या महावाक्यस्थ इदं शब्दानें स्वप्रकाशापरोक्षत्व अभिप्रेत आहे, असें म्हटलें आहे. अशा प्रकारें भेदातीत आणितेच ब्रह्म आहे असा पुढें अन्वय जाणवा. याविषयीं मांडूक्य श्रुति प्रमाण आहे. अर्थात् 'अयमात्मा ब्रह्म' या अथर्ववेदांतील महावाक्याचा अर्थ या श्लोकांत सुचविला आहे.

आपलें स्वरूप कं म्हणजे निरतिशय सुखरूप असून सत् म्हणजे कालत्रयानें अबाधित आहे. अखिलजगानें साक्षी असलेल्या ब्रह्माचें बाधरहितत्व हेंच सत्यत्व आहे असें सांगितलें आहे. तसेंच तें चिद्‌घन म्हणजे चैतन्यैकरस आहे. याप्रमाणें 'सत्यं ज्ञानमनन्तम्' इ. वाक्यार्थही सुचविला आहे. असें तुमचें पद अघनुत् म्हणजे पापपुण्यरूपी बन्धहरण करणारें आहे. भगवंतानीं 'बुद्‌ध्या युक्तो' इत्यादि श्लोकांतून पापपुण्यराहित्य सांगितलें आहे कारण मुमुक्षूला पापाप्रमाणें पुण्य हेंही बन्धनकारकच आहे, म्हणूनच 'त्यज धर्ममधर्मं च' येथें

अधर्माबरोबर पुण्यरूपी धर्माचाही त्याग उपदेशिला आहे. अर्थात् मोक्षाला प्रतिबन्धक अशा अपायांचें हरण करणारी अशी, स्वरूपापेक्षां विलक्षण असलेल्या असत् आणि जड देहदिकांचा मिथ्या म्हणून त्याग करिते अशा बुद्धीलाच तें स्वरूप गोचर होतें. म्हणूनच कठोपनिष्दांत स्पष्ट म्हटलें आहे कीं 'सर्व भूतांचे ठायीं गुप्त रूपानें वसत असलेलें आत्मतत्त्व स्थूल बुद्धीला विषय होत नसलें तरी ज्ञान्यांना शास्त्राचार्योपदेशानें संस्कृत आणि सूक्ष्म म्हणजे अत्यंत सात्विक असलेल्या बुद्धीच्या योगें तें ज्ञात होत असतें' अर्थात् अशा आत्मतत्त्वाचे ज्ञान झाल्याबरोबर सर्व ज्ञात होतें. बृहदारण्यकांत 'या आत्म्याचेंच दर्शन करावें आणि त्यासाठीं सोहंभावात्मक श्रवणादिकांचा अभ्यास अल्पही भेददृष्टी न ठेवतां करावा. कारण अल्प भेददृष्टीपासूनही भय उत्पन्न होतें' असें सांगितलें आहे. 'द्वितीयापासूनच भय होतें' असें पण श्रुतिवचन आहे. अशा परब्रह्मस्वरूप आपल्या पदकमलाच्या दर्शनानें सर्व अनर्थनिवृत्ति होते असें 'भिद्यते हृदयग्रन्थिः' आणि 'ज्ञात्वा देवं सर्वपाशापहानिः' इ. श्वेताश्वतर आणि मुण्डकादि उपनिषदांतून वर्णन केलें आहे।। ७।।

याप्रमाणें सच्चिदानन्दस्वरूप परब्रह्मापासूनच उत्पन्न झालेल्या जीवांना वस्तुतः ब्रह्मरूपप्राप्ति आणि त्यामुळें सर्व अनर्थनिवृत्ति होते असें सांगितलें. हेंच 'ब्रह्मरूप होऊन ब्रह्मांत मिळतो,' 'शोकाच्या पार तरून जातो' इ. श्रुतींनीं सांगितलें आहे.

आतां असा विचार प्राप्त होतो कीं, परमात्म्यापासून सर्व जगत् उत्पन्न होतें त्याअर्थी आत्मा हा कुंभकारादिकाप्रमाणें जगाचा कर्ता (निमित्त मानावा कीं, जगद्रूपानें विकार पावतो (उपादान) असें समजावें ? चैतन्यैकरस आत्मा क्रियारहित असल्यामुळें त्याच्या ठिकाणीं बाहेरील मृत्तिकादिद्रव्यांनीं युक्त असलेल्या कुम्भकारादिकाप्रमाणें त्याला कर्ता मानतां येत नाहीं. 'निष्कलं निष्क्रियं' इत्यादि श्रुतीनें हें सांगितलें आहे. बरें तो जगद्रूपानें विकृत होतो असें म्हणावें तर तेंही योग्य नाहीं; कारण 'आकाशवत्' इ. श्रुतीवरून आत्म्याचें अपरिणामित्व सिद्ध होतें. बरें नैयायिकाप्रमाणें, नित्य असलेलें पृथिव्यादिभूतचतुष्टयाचे परमाणूच जगदुत्पादक आहेत असें मानावें तर तेंही ठीक नाहीं. कारण, स्रष्टीपूर्वी ईश्वरच असल्यानें त्यांचाही अभावच असतो. 'सृष्ट्यारंभीं एक आत्मतत्त्वच होतें' असें ऐतरेय श्रुति सांगत आहे. सांख्यसिद्धांताप्रमाणें प्रकृतीलाच जगत्कारण मानतां येत नाहीं. कारण ती जड असल्यानें तिच्या इकाणीं कार्य करण्याचें सामर्थ्य नाहीं. तर मग जड जगाची उत्पत्ति झाली कशी ? याचें उत्तर असें आहे कीं -

लोकांत जड रथादिकांच्या ठिकाणीं आपलें कार्य उत्पन्न करण्याचें सामर्थ्य दिसन नसून चेतनाच्या अधिष्ठानानेंच कार्यकर्तृत्व दिसतें; तसेंच परमात्म्याच्या ईक्षणामुळें जड मायेपासून ही जगाची उत्पत्ति पाण्यांतील बुडबुडयाप्रमाणें विवर्तन्यायानें मानितां येते. कारण जग हें चेतन आणि अचेतन उभयस्वरूप आहे. 'मायां तु प्रकृतिं विद्यात्' इत्यादि अनेक श्रतिस्मृतिवचनांवरून हें सिद्ध होतें.

याप्रमाणें आत्मस्वरूपापासून विवर्तन्यायानें उत्पन्न झालेल्या संसारी जीवाच्या परमकल्याणार्थ केलेल्या या स्तोत्राचें तात्पर्य निश्र्चित करून इष्टसिद्धीसाठीं इष्टदेवतेची प्रार्थना करीत या फलदायक स्तोत्राचा उपसंहार करितात :-

अजनमोहनमोह नमो ह नः प्रिय नियोजय तेन यतेन ते।।
य इह वेदनिवेदनि वेद वेत्त्यजपदं जपदंतपदं पदम्।।८।।

अन्वय : हे अजनमोहनमोह यतेन! ते नमः। हे प्रिय तेन ते पदेन नियोजय। यः वेदनिवेदनि इदं स्तोत्रं इह वेद, (सः) जपदन्तपदं अजपदं पदं वेत्ति।।८।।

अर्थ :- अखिल जगास भूल पाडणा-या मोहाला अविषय अशा यतिश्रेष्ठा ! तुम्हाला नमस्कार असो. सर्वभूतसुहृद् देवा ! त्या तुझ्या पदाचा आम्हास लाभ करून दे. जो सर्व वेदांच्या अर्थाचें प्रतिपादक असें हें स्तोत्र यथार्थ रूपानें जाणतो, त्यास योग्याचें परमध्येय आणि ध्यानानें योगिजन ज्याची प्राप्ति करून घतात त्या तुमच्या स्वरूपाचा साक्षात्कार प्राप्त होतो.

ॐ तत्सत्।। गुरोः कृपैव केवलम्।।

टीकार्थ :- महाराज, आपण अज असला तरी आपल्या इच्छेनें जन्म घेतां. अखिल जगाला मोहविण-या मोहापासून दूर आहांत; कारण आपण सर्वज्ञ आहांत. 'यः सर्वज्ञः' इत्यादि श्रुति आणि 'ज्ञोऽत एव' इत्यादि सूत्रें हेंच सांगत आहेत. आपण सर्व भूतांचे मित्र आहांत, 'द्वासुपर्ण सयुजा सखाया' इथें हें दर्शविलें आहे. जितेन्द्रिय ब्रह्मनिष्ठांचे स्वामी आहांत. सद्गुरुमहाराज, त्या आपल्या पूर्वोक्त स्वरूपाशीं आमचा योग करून द्या. (याप्रमाणें विदेह-कैवल्याची प्रार्थना करण्यांत आली आहे.) 'अज नः तेन नियोजय' येथेंही 'नः' यानें जीवरूप युष्मत्पदार्थ आणि 'अज तेन' यानें तत्पदार्थ दर्शवून 'नियोजय' यानें 'असि' पदप्रतिपाद्य ऐक्य सुचविलें आहे.

याप्रमाणें या स्तोत्रांत असम्भावनादिदोषांचें निरसन करून श्रवणादिकांच्या योगें तत्त्वंपदार्थशोधनपूर्वक विजातीयप्रत्ययाच्या निराकरणानें सजातीयब्रह्मैकगोचर अशा प्रत्ययाच्या प्रवाहीकरणरूप जें तत्वंपदांतील लक्ष्यार्थरूप चैतन्याचें अवधारण व्हावें आणि अखण्ड असें ब्रह्मस्वरूप मला करावें अशी सद्गुरुचरणीं प्रार्थना केली आहे.

संशयभावना, असंभावना आणि विपरीतभावना हे तीन तत्वज्ञानांतील प्रतिबन्ध आहेत. ज्याप्रमाणें ॠग्वेदादि अनेक शाखांतून सांगितलेल्या उपनयनादि कर्मांत भेद असतो तद्वत् भिन्न शाखांतील आत्मतत्त्वही अनेक प्रकारचें असावें ही संशयभावना वेदान्तवाक्यतात्पर्यावधारणरूप श्रवणानें नष्ट होते आणि परस्परांहून अत्यंत भिन्न आणि सत्य भासणारे जीव, ईश्वर आणि जगत् यांच्यांतील भेद खरा आणि नेहेमीं टिकणारा आहे, ही असंभावना. स्वप्नदृष्टांतादि युक्तिपूर्वक मनन केल्यानें हिचें निवारण होतें. श्रवण आणि मनन केल्यावरही अनादि वासनांमुळें जगत्सत्यत्वाचा प्रत्यय येणें ही विपरीत भावना. ब्रह्मावांचून इतर विषय मनांतही न आणतां केवळ ब्रह्माकारप्रत्ययाचें सतत अनुसंधानरून निदिध्यासनानें ती नष्ट होते. याप्रमाणें तीनही प्रतिबंध नाहींसे झाल्यावर उपक्रमादि सहा लिंगांच्या साहाय्यानें महावाक्याचें निश्चित ज्ञान (अपरोक्षसाक्षात्कारस्वरूप) होऊन मुक्ति प्राप्त होते.

उपक्रम-उपसंहार, अभ्यास, अपूर्वता, फल, अर्थवाद आणि उपपत्ति अशीं तीं सहा लिंगें होत. उदाहरणार्थ - छान्दोग्योपनिषदांत - 'सदेव सौम्येदमग्र आसीदेकमेवाद्वितीयम्' असा आरम्भ करून 'ऐतदात्म्यमिदं सर्वं तत्सत्यं स आत्मा' असा अखण्डैकरसरूप आत्म्याचाच उपसंहार केला आहे. त्याचाच 'तत्त्वमसि' असा नऊ वेळां अभ्यासपूर्वक उपदेश केला आहे. त्या अखण्डैकरसरूपी आत्म्याचें प्रत्यक्षादिप्रमाणांना विषय न होणें हीच त्याची अपूर्वता आहे. 'तस्य तावदेव चिरं' या वाक्यानें प्रारब्धकर्मभोगानन्तर तत्त्वज्ञानोत्तर विदेहकैवल्य प्राप्त होणें हेंच फल होय. 'वाचारंभणं... मृत्तिकेत्येव सत्यम्' हा दृष्टान्त सांगितला आहे.

१. सृष्टि, २. स्थिती, ३. प्रलय, ४. प्रवेश, ५. नियमन, ६. पदार्थपरिशोधन आणि ७. फल यांचे प्रतिपादन करणारे सात अर्थवाद होत. त्यांत 'तस्माद्वा... आत्मनः' इत्यादि सृष्टी प्रतिपादन करणा-या श्रुति; आकाशादिकांची उत्पत्ति ब्रह्मापासून आणि ब्रह्मांतच त्यांची स्थिती आणि लय होत असल्यानें मृत्तिकेंतच उत्पत्ति, स्थिति आणि लय पावणाश्रया घटाचा जसा मृत्तिकेशीं वास्तविक अभेदच असतो, तद्वत् आकाशादिकांचीही कारणस्वरूप अशा ब्रह्माशीं अभिन्नता दर्शवितात; आणि महावाक्यांत सांगितलेलें ब्रह्माचें ऐक्य सिद्ध करितात. 'तत्सृष्ट्वा तदेव' इत्यादि श्रुति पंचीकृत भूतांपासून झालेल्या स्थूल शरीरांत ब्रह्माचाच जीवरूपानें प्रवेश वर्णन करीत महावाक्यप्रतिपादित जीवब्रह्मैक्याचेंच प्रतिपादन करितात. येथें प्रवेश म्हणजे अवच्छेदपक्षांत घटकाशादिकाप्रमाणें आणि प्रतिबिंबपक्षांत जलांतील प्रतिबिम्बित चन्द्राप्रमाणें जाणावा. नाहींतर बाहेरून घरांत प्रवेश करणा-या देवदत्तादिकाप्रमाणें प्रवेश मानिला वर ब्रह्माचें विभुत्व सिद्ध होणार नाहीं. 'अग्निर्यथैको' इत्यादि श्रुति आणि 'अत एव चोपमा सूर्यकादिवत्' हें सूत्र ब्रह्माच्या जगद्व्यापकत्वाविषयीं प्रमाण आहे. पंचमहाभूतांचें पंचीकरण विद्यारण्यांनीं पुढीलप्रमाणें सांगितलें आहे - 'प्रत्येक महाभूताचे दोन दोन भाग करून पैकीं प्रत्येक भूताच्या अर्ध्या भागाचे चार भाग करावे आणि एक एक तो अष्टमांश भूतभाग दुस-या अर्ध्या भूतभागांत मिळवावा, याला पंचीकरण म्हणतात.

'पांच ज्ञानेन्द्रियें, पांच कर्मेंद्रियं, पांच प्राण, मन व बुद्धि हीं सतरा तत्त्वें मिळून सूक्ष्म लिंगशरीर होत असतें. याप्रमाणें सूक्ष्म आणि स्थूल शरीरें जाणावींत.

'यः पृथिव्यां तिष्ठन्' इत्योदि भेद श्रुति दर्शविते व ब्रह्म आणि पृथिव्यादिकांचा अत्यन्त भेद मानिल्यास नियम्यनियामकभाव उपपन्न होणार नाहीं. यावरून अभेद सिद्ध करते. 'यदग्ने रोहितं रूपम्' इत्यादि श्रुति तत्त्वंपदार्थरूप जीव आणि ईश्वर यांमधील विरुद्ध धर्मांचा निरास करून त्यांचें ऐक्यच दर्शवितात.

'ब्रह्मविदाप्नोति परम्' इत्यादि शेंकडों श्रुतिवचनें जीवब्रह्माभेदज्ञानाचें आत्यन्तिक निःश्रेयसस्वरूप फल सांगणारीं असून फलप्रदर्शनाच्याद्वारें ऐक्यच विवक्षित आहे असें दाखवितात. हें अर्थवादनामक पांचवें लिंग आहे.

याप्रमाणें उपक्रमादिलिंगांच्या मदतीनें तात्पर्यनिश्चयरूप श्रवणादिकांच्या योगानें 'तत्त्वमसि' या महावाक्याचें अखण्डज्ञान-पुढीलप्रमाणें-लक्षणेनें होत असतें.

या महावाक्यांतील पदांचा परस्पर सामानाधिकरण्य हा संबंध आहे. आणि पदार्थांचा विशेषणविशेष्यभावसंबंध असून लक्ष्यार्थप्रत्यगात्म्याचा त्यांच्याशीं लक्ष्यलक्षणभावरूप संबंध आहे. जसें 'तो हा देवदत्त' इथें 'तो' आणि 'हा' या दोन पदांची देवदत्तपिण्ड या एका अर्थांत वृत्ति आहे यास त्यांचें सामानाधिकरण्य म्हणतात - तसें तत् आणि त्वं यांचेंही जाणवें. तसेंच 'तो' - त्या वेळेस अमक्या स्थळीं पाहिलेला आणि 'हा'-येथें आणि या वेळेस असलेला अशा देशकालविशिष्ट व्यक्तिवाचक 'सः' आणि 'अयम्' या शब्दांच्या अर्थांचा परस्पर विशेष्यविशेष्णभाव संबंध होतो, कारण ते दोघेही परस्परांचे व्यावर्तक आहेत. तद्वत् सर्वज्ञत्व आणि परोक्षत्व यांनीं विशिष्ट चैतन्याचा वाचक तत् शब्द आहे आणि 'त्वं' शब्द किंचिज्ञत्व अपरोक्षत्वांनीं युक्त चैतन्याचा. या दोन्ही पदार्थांना परस्परव्यावर्तकत्व असल्योनें यांचा विशेष्यविशेषणभाव होतो. तसेंच 'सः' आणि अयम्' या पदांनी अथवा त्यांच्या अर्थांनीं जेव्हां पिण्डच विवक्षित असतो तेव्हां विरुद्ध असलेल्या देशकालादि अंशांचा त्याग करून अविरुद्ध असलेला देवदत्त हाच अर्थ लक्ष्य असतो, म्हणून त्यांचा जसा व्यक्तीशीं लक्ष्यलक्षणभाव मानितात तसें 'तत्त्वं' हीं पदें किंवा यांचे अर्थ जेव्हां अखण्डसच्चिदानन्दरूप अर्थात् विवक्षित असतात. तेव्हां विरुद्ध असलेल्या अंशांचा त्याग करून अविरुद्ध शुद्ध चैतन्यरूप अर्थ लक्ष्य असल्यानें त्यांचा लक्ष्यलक्षणभाव संबंध सिद्ध होतो. सरळवाक्यार्थासाठीं मुख्यवृत्ति. नीलकमल येथें - अभेद गौण असल्यानें - गौण वृत्ति आणि लक्ष्यार्थासाठीं लक्षणावृत्तिअशी तीन प्रकारची वृत्ति. (म्हणजे शब्दाचा अर्थाचें ज्ञान करून देणरा संबंध). प्रकृतस्थळीं (तत्त्वमसि येथें) लक्षणावृत्तिच घ्यावी असें शिष्टांचें म्हणणें आहे. उदाहरणार्थ - 'एकाच पदार्थांत प्रत्यक्त्व परोक्षत्व इत्यादि धर्म हें विरुद्ध असल्यानें तेथें लक्षणेचीच प्रवृत्ति होते. केवळ मुख्य अर्थाची विवक्षा केली असतां जर प्रमाणान्तराशीं विरोध येत असेल तर मुख्यार्थाशीं संबंध असलेल्या अर्थाची प्रतीति जिच्या योगें होते ती लक्षणा.''

ती लक्षणा तीन प्रकारची आहे. गंगायां घोषः अर्थात् गंगेवर (गंगातीरावर) गवळीवाडा. इथें (मुख्यार्थ त्याग कर्तव्य असल्यामुळें) जहल्लक्षणा मानावी. 'कावळयांपासून दहीं राख' येथें (कावळे, कुत्रे, मांजर इत्यादि विवक्षित आहेत, लक्ष्यार्थाबरोबर मुख्यार्थाचाही संग्रह असल्यानें) अजहल्लक्षणा आणि या दोहोंचें प्रक्रत (महावाक्य) स्थळीं ग्रहण करतां येत नसल्यामुळें भागत्याग किंवा जहद्अजहल्लक्षणाच जाणावी.

भाष्यकारांनींही स्पष्ट म्हटलें आहे कीं - '' 'सोऽयं' इत्योदि वाक्याप्रमाणें 'तत्त्वमसि' इत्यादि वाक्यामध्यें भागत्यागलक्षणाच जाणावी.''

येथे माया, मायाप्रतिबिम्ब आणि मायेचें अधिष्ठान असलेलें शुद्ध ब्रह्म हीं तीन्ही मिळून 'तत्' पदाचा वाच्य (मुख्य) अर्थ होतो. केवळ ब्रह्म हा लक्ष्यार्थ आहे. तसेंच अविद्या (अज्ञान) तींत प्रतिबिंबित जीव आणि अविद्येचें अधिष्ठान असें साक्षिचैतप्य हीं तीन्ही मिळून 'त्वं' पदाचा वाच्यार्थ व साक्षिस्वरूप आणि कूटस्थ असलेलें ब्रह्म चैतन्यच लक्ष्यार्थ आहे. अर्थात् दोन्ही पदांचे लक्ष्यार्थ अविरुद्ध असून त्यांचें ऐक्यच महावाक्याचें खरें 'लक्ष्य' आहे. माधुर्य, पातळपणा इत्यादि गुणांनीं युक्त असलेल्या तलावांतील पाण्याचा जसा घटांतील जलाशीं अभेद असतो किंवा लाल, गरम व प्रकाशमय असलेल्या लहान दीपज्योतीचें जसें

मोठ्या प्रदीप ज्योतीशीं ऐक्य असतें तद्वत् येथेंही - शुद्ध चैतन्याचें ऐक्य - हा अखण्डार्थ लक्ष्य जाणवा.

अशा प्रकारें विरुद्ध अंश टाकून अविरुद्ध वाक्यार्थग्रहणरूपी श्रवण, मनन आणि निदिध्यासन व समाधींच्या योगेकरून तुमच्या पदांशीं (ज्याला लोक प्राप्त होतात) पदशब्दवाच्य अशा मला (प्राप्त होणरा पद्यते इति पदः) संयुक्त कर; कारण हें नियोजन किंवा संमेलनसुद्धां आपल्याच कृपेच्या आधीन आहे. 'हा आत्मा प्रवचनादिकांनीं प्राप्त होत नाहीं' इत्योदि श्रुतिवचनांनीं हें स्पष्ट सांगितलें आहे.

स्तोत्राची फलश्रुति सांगतात :- जो साधनचतुष्टयानें युक्त असलेला अधिकारी पुरुष हें वेदनिवेदनि अर्थात् उपनिषत् सिद्धान्तांचें प्रतिपादन करणारें स्तोत्र निश्चयें करून आणि यथार्थरूपानें जाणतो तो महावाक्यार्थ चिंतन करणा-या ब्रह्मनिष्ठांच्या हृदयसिंहासनावर विराजमान असणा-या, योगिगम्य आणि विकारातीत अशा भगवत्स्वरूपाला जाणतो. अशा प्रकारें प. प. श्रीमत्सद्‌गुरु वासुदवानन्दसरसवतीस्वामी महाराजांनीं स्वकृत स्तोत्रावर केलेली व्याख्या येथें समाप्ति पावली. या विवचृतीनें श्रीसद्‌गुरुस्वरूपी दत्तमहाराज प्रसन्न होवोत. ।।